जिल्हा परिषद,यवतमाळ
कार्यालय,शिक्षण विभाग,प्राथमिक
दुसरा माळा, प्रशासकीय इमारतआर्णी रोड ,, यवतमाळ
E-mail – copriytl@gmail.com_ दुरध्वनी क्र. 07232244295-

---

यजिप/शिविप्रा/ कावि/१-आस्था/ १३८० /२०२४ यवतमाळ दिनांक:- २९-०२-२०२४

शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ मुलाखती शिवाय पदनिवडीचा विकल्प दिलेल्या संस्थांमध्ये पवित्र प्रणाली अंतर्गत शिक्षक पदभरती निवड यादीतील उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी बाबत व पुढील आवश्यक कार्यवाही बाबत.

# जाहीर सुचना

जिल्हा परिषद यवतमाळ द्वारा शिक्षक पदभरती करीता पवित्र प्रणालीवर दिलेल्या मराठी माध्यम – ३६८ उर्दु माध्यम – २८ पदांची जाहीरातीनुसार शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ यामध्ये प्राप्त गुणांच्या आधारे पवित्र प्रणालीवर एकूण मराठी माध्यम २६९ उर्दु माध्यम – १३ उमेदवाराची गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

यवतमाळ जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा परिषद व्यवस्थापनासाठी पात्र उमेदवारांची कागदपत्रांची पडताळणी पुढील प्रमाणे नमूद वेळापत्रकाप्रमाणे दि.०२/०३/२०२४ ते दिनांक ०४/०३/२०२४ अखेरपर्यत **जिल्हा परीषद सभागृह, जि. प. यवतमाळ** येथें पुर्ण करण्यात येईल. पवित्र पोर्टल प्रणाली अंतर्गत शिक्षण सेवक सरळ सेवा भरती प्रक्रीयेतील यवतमाळ जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा परिषद व्यवस्थापनासाठी पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांनी खालील प्रमाणे नमूद वेळापत्रकाप्रमाणे आपल्या पात्रतेसबंधित आवश्यक सर्व **मुळ कागदपत्रासह** तपासणी कक्षात उपस्थित राहून कागदपत्रे पडताळणी बाबत कार्यवाही पुर्ण करून घ्यावयाची आहे. सबंधित पात्र उमेदवार पडताळणी कालावधीत पडताळणीसाठी उपस्थित न राहील्यास सबंधित उमेदवाराची अनुपस्थिती राज्य स्तरावर कळविण्यात येईल व त्यानुसार पुढील आदेशाप्रमाणे पदस्थापनेबाबत कार्यवाही करण्यात येईल. उमेदवाराच्या अनुपस्थिती बाबतची सर्व जवाबदारी सबंधित उमेदवाराची राहील याची नोंद घ्यावी. तसेच ज्या उमेदवाराची नियुक्ती ही मागास प्रवर्गात झालेली आहे अशा उमेदवारांनी **मुळ कागदपत्रा सोबतच त्यांचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्रामध्ये जात प्रमाणपत्राची जावक क्र. व दिनांकाची नोंद नमूद असणे आवश्यक आहे.**

जिल्हा परिषद यवतमाळ विकल्प दिलेल्या पवित्र प्रणालीवर प्रसिध्द गुणवत्ता यादीतील उमेदवारांनी सदर यादीतील अनुक्रमांनुसार खालील प्रमाणे नमूद दिनांक व वेळेस पवित्र प्रणालीवर स्वप्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली माहीती व त्या अनुषंगाने अपलोड केलेली कागदपत्रानुसार मुळ कागपत्राचे तपासणी करीता **जिल्हा परीषद सभागृह, जि. प. यवतमाळ** येथे न चुकता उपस्थित राहावे.

| अ.क्र. | पवित्र प्रणालीवर प्रसिध्द यादीतील उमेदवाराचा अ.क्र. | मुळ कागदपत्रे तपासणीकरीता उपस्थित राहण्याचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | मराठी माध्यम **१ ते ९४** | ०२/०३/२०२४ | ११.०० वा. ते ६.०० वा. |
| २ | मराठी माध्यम **९५ ते १८८** | ०३/०३/२०२४ | ११.०० वा. ते ६.०० वा. |
| ३ | मराठी माध्यम **१८९ ते २६९** व उर्दु माध्यम **१ ते १३** | ०४/०३/२०२४ | ११.०० वा. ते ६.०० वा. |

**अर्जदारांनी मुळ दस्तऐवज पडताळणी दरम्यान खालील कागदपत्रे / प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.**

१. पवित्र प्रणालीवर अपलोड केलेले स्वप्रमाणपत्राची प्रत.
२. शाळा महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र.
३. निवड यादी नुसार सदर पदास आवश्यक असलेले अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ (TAIT-२०२२ व TET २०२२) प्रमाणपत्र.
४. शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र (गुण पत्रिका) १० वी / १२ वी / पदविधर / पदवित्तर प्रमाणपत्र व गुण पत्रिका
५. व्यावसायिक अर्हता ई. १ ली ते ५ वी करीता, व्यावसायिक अर्हता शिक्षण शास्त्र पदविका प्रमाणपत्र D.Ed / D.LEd/ D.Ted/ D.ch. प्रमाणपत्र व गुण पत्रिका.
६. व्यावसायिक अर्हता शिक्षणशास्त्र पदविका / पदवी प्रमाणपत्र गुणपत्रक.

७. वयासबंधी दाखला (जन्माचा दाखला / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्राचे /शालांत परिक्षा प्रमाणपत्र)
८. जातीचे प्रमाणपत्र.
९. जात वैधता प्रमाणपत्र.
१०. अधिवास प्रमाणपत्र (एस.डी.ओ./उपजिल्हाधिकारी यांनी दिलेले) महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील ८६५ गावातील रहीवासी प्रमाणपत्र.
११. उन्नत गटात मोडत असल्याचे प्रमाणपत्र (Non -Creamy layer) लागू असल्यास
१२. समांतर आरक्षणा अंतर्गत निवड असल्यास समांतर आरक्षणाप्रमाणे माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र / पदविधर अंशकालीन असल्याचे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र / प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र/भुकंपग्रस्त प्रमाणपत्र/ खेळाडू करीता विभागीय क्रिडा उपसंचालक यांचे पडताळणी अहवाल अथवा पडताळणी प्रस्ताव दाखल केल्याची पोच पावती.
१३. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य असल्याचे प्रमाणपत्र / १९९१ ची जणगनना / १९९४ चे निवडणूक कर्मचारी असल्याबाबतचे प्रमाणपत्र.
१४. अनाथ असल्यास प्रमाणपत्र.
१५. दिव्यांग असल्यास प्रमाणपत्र - शिक्षक अभियोग्यता परीक्षेकरीता दिव्यांग सवलत घेतली असल्यास / दिव्यांग आरक्षणातून निवड झाली असल्यास सक्षम अधिकारी यांचे ४० टक्के दिव्यांग प्रमाणपत्र
१६. शासकिय निम शासकिय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेतल्याचे प्रमाणपत्र
१७. छोटे कुटूंब असल्याचे प्रमाणपत्र.
१८. नावात बदल असल्यास प्रमाणपत्र.
१९. नियुक्ती करीता निवड झाल्यानंतर बंदपत्र भरून देणे बंधनकारक राहील.
२०. ओळखपत्र - आधार कार्ड / ड्रायव्हिंग लायसन्स / पॅन कार्ड

शिक्षण सेवक प्राथमिक पदाकरीता निवडीसाठी मुळ दस्तऐवज तपासणी करीता बोलविण्यात येणाऱ्या उमेदवारांनी मुळ दस्तऐवज पडताहणी दरम्यान उक्त प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतीच्या स्वप्रमाणित केलेली दोन प्रती व पासपोर्ट साईज फोटो न चुकता सादर करावी.

वरील मुळ कागद पत्रे प्रमाणपत्रे सादर केल्या शिवाय व सदर कागदपत्राची वैधता सिध्द झाल्याशिवाय आपली निवड केली जाणार नाही तसेच प्रमाणपत्र / कागदपत्रे सादर करण्याकरीता कुठलीही अतिरिक्त मुदत दिली जाणार नाही. व अशा उमेदवारास नियुक्ती दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

29.02.24

(किशोर पागोरे)
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
जिल्हा परिषद यवतमाळ

**प्रतिलिपी :-**

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा) जिल्हा परिषद, यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर.